आगच्छत् शिक्षार्थम्। निर्गच्छत् सेवार्थम्।

# महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा) औरंगाबाद

## School Leadership Academy, Maharashtra

## मोड्यूल क्र.४०

### गडचिरोली जिल्ह्यातील एटापल्ली या अतिदुर्गम भागात पालक शिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता विकासात शालेय नेतृत्वाची भूमिका.

### The Role School Leadership in Quality Education of Students through Parent Education in Etapalli, a Remote Area of Gadchiroli District.

**प्रस्तावना :**

निरक्षरता हा व्यक्तिविकासातील पर्यायाने सामाजिक, राष्ट्रीय विकासातील मोठा अडथळा आहे, शिक्षण हे शाळेबरोबर संपत नाही तर ते जीवनातील विविध प्रसंगांच्या अनुषंगाने होत राहते. काम करणे आणि जगणे या गोष्टी जीवनासाठी अविभाज्य आहेत, साक्षरता आणि प्रत्यक्ष कृती यांच्याद्वारे निरक्षर गरीब, आदिवासी लोक स्वतःला दारिद्र्यातून मुक्त करू शकतात.आपल्या देशात अतिदुर्गम भागात जे गरीब, आदिवासी लोक राहतात त्यांच्यापर्यंत निरक्षरतेमुळे राष्ट्रीय, सामाजिक, वैयक्तिक विकासाच्या योजना पोचत नाहीत. त्यांना शिक्षणाचेही महत्त्व वाटत नाही. त्यामुळे ते आपल्या पाल्यांच्या शिक्षणाबद्दलही उदासीन असतात. गडचिरोली जिल्ह्यातील एटापल्ली सारख्या अतिदुर्गम भागात तर याबाबतीत फारच बिकट परिस्थिती आहे. निरक्षरतेच प्रमाण फार अधिक आहे.

गडचिरोली जिल्हा 26 ऑगस्ट 1982 रोजी चंद्रपूर जिल्ह्यापासून वेगळा करण्यात आला तेव्हा हा महाराष्ट्राचा 31 वा जिल्हा म्हणून अस्तित्वात आला. महाराष्ट्र राज्याच्या उत्तर-पूर्व सीमेवर वसलेला असून तेलंगणा व छत्तीसगड राज्यांच्या सीमा लागून आहेत. गडचिरोली जिल्हा पूर्णपणे नक्षलग्रस्त जिल्हा म्हणून ओळखला जातो. हा जिल्हा अतिदुर्गम, डोंगरदऱ्याने व्याप्त व अविकसित असून 76 % जंगलाने व्यापलेला असल्याने जंगलात नक्षलवाद्यांना आश्रय घेण्यासाठी मदत होते.

२०११ च्या जनगणनेनुसार जिल्ह्याची एकूण लोकसंख्या १०७२९४२ असून पुरुष व स्त्रिया यांची लोकसंख्या अनुक्रमे ५४१३२८, ५३१६१४ याप्रमाणे आहे. जिल्ह्यात अनुसूचित जाती व जमातीची लोकसंख्या अनुक्रमे १२०७४५ व ४१५३०६ एवढी आहे. जिल्ह्यामध्ये अनुसूचित जाती व जमातीची लोकसंख्येची

टक्केवारी अनुक्रमे ११.२५ % व ३८.७ % आहे. गडचिरोली जिल्ह्यात एकूण १२ तालुके असून प्रशासनाच्या दृष्टीने दोन तालुक्यांचे मिळून एक असे सहा उपविभाग निर्माण केले आहेत. (गडचिरोली, वडसा(देसाईगंज), अहेरी, चामोर्शी, एटापल्ली,कुरखेडा). गडचिरोली जिल्ह्यामध्ये मुख्यतः गोंडी, माडिया, मराठी, हिंदी, तेलगू, बंगाली, छत्तीसगडी इत्यादी भाषा बोलल्या जातात.

जिल्ह्याच्या पूर्वेतर भागात धानोरा, एटापल्ली, अहेरी व सिरोंचा तालुके असून घनदाट जंगलाने व्याप्त आहे. जिल्ह्याच्या भामरागड, टिपागड, पलसगड व सुरजागड भागात उंच टेकड्या आहेत. २०११ च्या जनगणनेनुसार गडचिरोली जिल्ह्यातील साक्षरतेचे प्रमाण ६२.९७% आहे.

गडचिरोली जिल्ह्याच्या पूर्वेकडे जिल्ह्याच्या ठिकाणापासून १५५ किमी. तसेच बल्लारपूर रेल्वे स्टेशन पासून १२० किमी. अंतरावर सुरजागड टेकडीच्या ४५ किमी अलीकडे अतिदुर्गम व नक्षलग्रस्त भागात एटापल्ली हा पूर्णतः घनदाट जंगलाने व्यापलेला आदिवासी तालुका वसलेला आहे. एकूण १९७ खेडी असून २०११ च्या जनगणनेनुसार एकूण ८२७५१ लोकसंख्या आहे, पैकी ४१८२३ पुरुष व ४०९२८ स्त्रिया आहेत. एकूण साक्षरतेचे प्रमाण ५८.७९% असून पुरुष व स्त्रियांचं साक्षरतेचे प्रमाण अनुक्रमे ६८.०५% व ४९.३६% असे आहे तर अतिदुर्गम भागात साक्षरतेचे प्रमाण ३० % पेक्षाही कमी आहे. तिथली केवळ सध्याचीच पिढी शिक्षणाच्या प्रवाहात येत आहे.

**मोड्यूल अध्ययनाची उद्दिष्टे:**

1) अतिदुर्गम भागांतील शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता विकासात पालक शिक्षणाची गरज समजण्यात शालेय नेतृत्वाची भूमिका अभ्यासणे..
2) अतिदुर्गम भागांतील शाळांमध्ये गुणवत्ता विकासासाठी पालक शिक्षणासाठी कृतीकार्यक्रम राबविण्यात शालेय नेतृत्वाची भूमिका समजून घेणे.
3) अतिदुर्गम भागांतील शाळांमध्ये पालक शिक्षणातून विद्यार्थ्यांचा शालेय विकास घडवून आणण्यासाठी शालेय नेतृत्वाची भूमिका समजून घेणे.

**मोड्यूल अंतर्गत विविध संकल्पना:**

**१. पालक शिक्षणातून विद्यार्थी शिक्षण :** एखाद्या गावाची, समाजाची प्रगती ही त्या गावातील शैक्षणिक, आर्थिक परिस्थितीवर अवलंबून असते. विद्यार्थी हे देशाचे भवितव्य आणि संपत्ती आहेत. त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पोषक वातावरण निर्माण करणे ही आपली सामूहीक जबाबदारी आहे. बालकांच्या जडणघडणीत पालकांचा सर्वात जास्त वाटा असतो. पण जिथे पालक निरक्षर आणि शिक्षणाविषयी उदासिन असतात तिथे हे वातावरण निर्माण करण्याची जबाबदारी शाळा प्रमुख या नात्याने मुख्याध्यापक तसेच शिक्षकांवर येते.म्हणूनच विद्यार्थ्यांच्या शिक्षणाबरोबरच गुणवत्ता विकासासाठी पालकांची निरक्षरता दूर केली, त्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देण्यासाठी त्यांचे उद्बोधन केले तर त्याचा शालेय विकासात नक्कीच हातभार लागेल. बालकांच्या जडणघडणीत पालक, शिक्षक, समाज सगळयांचाच बरोबरीने सहभाग असेल तर शाश्वत विकास होईल, शिक्षणाची पिढी तयार होईल हा विचार करून शाळांनी पालक शिक्षणासाठी कृतीकार्यक्रम आखून अंमलात

आणले तर त्याचा विद्यार्थ्यांच्या शिक्षणातील अडथळा दूर होईल. आणि निश्चितच विद्यार्थ्यांचा गुणवत्ता विकास होईल.

**२. प्रौढ शिक्षण:** सामान्यतः प्रौढ म्हंटले की सार्वत्रिक आणि सक्तीच्या शिक्षणाची वयोमर्यादा संपलेली व स्वतःची उपजीविका स्वतःच करावयास लागलेली व्यक्ती. शिक्षणाच्या दृष्टीकोनातून साधारणतः सतरा-अठरा वर्षाच्या वयापलीकडील व्यक्ती ज्यांना औपचारिक आणि अनौपचारिक अनुभवाद्वारे ज्ञान, कौशल्ये, वृत्ती, अभिरुची अथवा मूल्ये प्राप्त होतात त्याला प्रौढशिक्षण म्हणतात. औपचारिक शिक्षणाचा काळ संपल्यावर व्यक्ती स्वेच्छेने जे शिक्षण घेते ते प्रौढशिक्षण होय. हे शिक्षण अर्धवेळ असते.

**३. अध्ययन स्तर निश्चिती:** विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी विद्यार्थ्यांच्या वयाचा विचार करून अभ्यासक्रमाची रचना केली जाते. अभ्यासक्रम कार्यान्वित करतांना बालकाची योग्य दिशेने व अपेक्षित रीतीने प्रगती होत आहे का हे पाहणे महत्त्वाचे ठरते. आणि म्हणूनच शैक्षणिक क्षेत्रात अध्ययन निष्पत्ती ही संज्ञा उदयास आली. शिक्षणात कौशल्य विकास व अध्ययन निष्पत्तीवर भर देण्यात यावा. त्यानुसार विद्यार्थ्यांना विषय शिकवल्यानंतर काय साध्य झाले पाहिजे त्याला कोणती कौशल्ये आत्मसात झाली पाहिजे, कुठल्या क्षमता विकसित झाल्या पाहिजे यालाच अध्ययन निष्पत्ती (Learning Outcomes) असे म्हणतात.

अध्ययन मूल्यांकन करण्यासाठी देशातील सर्व राज्यातील व केंद्रशासित प्रदेशातील सर्व जिल्ह्यांमधील निवडक शाळांमध्ये NCERT मार्फत राष्ट्रीय संपादणूक सर्वेक्षण (NAS)चे आयोजन केले जाते. ज्यामध्ये असे आढळून आले की ५०% पेक्षा कमी विद्यार्थ्यांना त्या त्या इयत्तेच्या अध्ययन निष्पत्ती प्राप्त नाही. याचे मुख्य कारण म्हणजे अध्ययननिष्पत्ती साध्य करण्यासाठी लागणाऱ्या मूलभूत अध्ययन क्षमता प्राप्त नाही आहेत. जसे भाषा विषयात प्रारंभिक अक्षरओळख, शब्द, वाक्यवाचन, उतारावाचन, गोष्ट/कथा समजपूर्वक वाचन तर गणितात प्रारंभिक अंकओळख,संख्याज्ञान, संख्यांवरील मूलभूत क्रिया (बेरीज, वजाबाकी, गुणाकर, भागाकार). म्हणून प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र अंतर्गत गडचिरोली जिल्ह्यात जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेने अध्ययन स्तर निश्चिती हा कार्यक्रम हाती घेतला. दर १५ दिवसांनी विद्यार्थ्यांची अध्ययन स्तर निश्चिती करून त्यावर आधारित कृतीआराखडा करून देण्यात आला. जेणे करून विद्यार्थ्यांना योग्य अध्ययन अनुभवातून कृतियुक्त अध्यापन करून त्यांच्या मूलभूत क्षमता, संकल्पना प्राप्त करून घेण्यात आल्या.शिक्षकांना भाषा व गणित विषयाचे मूलभूत क्षमता विकासासाठी प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षणात मूलभूत क्षमता प्राप्त करून घेण्यासाठी, नवीन संकल्पना, संबोधांची ओळख करून देण्यासाठी योग्य कृती करून घेण्याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले. प्रत्येक कृतीची उद्दिष्टे स्पष्ट करून सांगण्यात आली. जेणेकरून मूल समजून घेण्यात मदत होईल व मूल मागे राहण्याची कारणे जाणून घेऊन त्यावर उपाययोजना करता येईल व विद्यार्थ्यांना मूलभूत अध्ययन क्षमता प्राप्त होतील.

**४. अध्ययन स्तर उंचावण्यासाठी शैक्षणिक पर्यवेक्षण प्रक्रिया :**

विद्यार्थ्यांचा अध्ययन स्तर उंचावण्यासाठी, गुणवत्ता विकासासाठी निश्चित केलेली उद्दिष्टे साध्य करण्यासाठी शाळेचा प्रमुख या नात्याने मुख्याध्यापक तसेच पर्यवेक्षकीय यंत्रणेतील केंद्रप्रमुख, विस्तार अधिकारी, गटशिक्षणाधिकारी तसेच गुणवत्ता विकासासाठी कार्यरत जिल्ह्याची शिखर संस्था जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण

संस्थेचे प्राचार्य, अधिव्याख्याता, विषय सहाय्यक आणि गटसाधनकेंद्राचे साधनव्यक्ती या सर्वांचीच फार मोठी भूमिका आहे. ज्या शाळांचा अध्ययन स्तर कमी आहे त्या शाळांना भेटी देणे, शिक्षकांना मार्गदर्शन करणे, शिक्षकांच्या अध्यापनातील अडचणी दूर करणे, विद्यार्थ्यांकडून कृती करून घेणे इत्यादी जबाबदारी पार पाडावी लागते. शाळा प्रमुख म्हणून मुख्याध्यापक शाळेची तसेच शिक्षकांची ध्येये स्पष्टपणे ठरवू शकतो आणि ती साध्य करण्यासाठी त्यांना संधी उपलब्ध करून देऊ शकतो.

**५.अध्ययनस्तर वृद्धी आणि पालकांची साक्षरता सहसंबंध:**

अतिदुर्गम आणि नक्षलग्रस्त भागांतील विद्यार्थ्यांच्या अध्ययन स्तर उंचावण्यामधील मोठी अडचण म्हणजे पालकांची निरक्षरता. आणि अतिदुर्गम भागात शैक्षणिक सोयीसुविधा, दळणवळणाची अनुपलब्धता या व अशा अनेक कारणांमुळे पालकांची शिक्षणाबद्दलची अनास्था.याकरिता प्रथम पालकांचे उद्बोधन करून त्यांना शिक्षणाचे महत्त्व तसेच साक्षर बनवण्याचे मोठे काम आहे. जेणेकरून त्यांचा व पर्यायाने विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढून अध्ययन स्तर उंचावण्यास प्रोत्साहन मिळते. यासाठी शाळा प्रमुख म्हणून विद्यार्थ्यांसाठी तसेच पालकांसाठी विविध उपक्रम राबवून शैक्षणिक वातावरणात सुधारणा करणे आवश्यक आहे ज्यामुळे पालकांना शिक्षणाचे महत्त्व पटेल आणि विद्यार्थ्यांनाही शिक्षणाची गोडी निर्माण होईल.

**गडचिरोली जिल्ह्यातील एटापल्ली या अतिदुर्गम व नक्षलग्रस्त भागांतील शाळा व शालेय नेतृत्वापुढील आव्हाने:**

1) अतिदुर्गम व नक्षलग्रस्त भागांमध्ये रस्ते तसेच इतर सोयीसुविधांचा उदा. वीज, पाणी, नेट कनेक्टीव्हिटी इत्यादींचा अभाव.
2) एटापल्ली हा भाग पूर्णतः आदिवासी असल्यामुळे मोठ्या प्रमाणात बोलीभाषेचा वापर होत असल्यामुळे भाषेची मोठी समस्या आढळून येते.
3) अतिदुर्गम, आदिवासी भागांत पालक निरक्षर असल्यामुळे पालकांची शिक्षणाबद्दलची अनास्था ह्या मोठ्या आव्हानाला शिक्षकांना, शालेय नेतृत्वाला सामोरे जावे लागते.
4) आदिवासी भागात जुन्या परंपरा, रूढी यांचा अधिक पगडा असल्यामुळे मुलींना शाळेत पाठवीत नाहीत.
5) पालक आपल्या पाल्यांना शाळेत न पाठवता आपल्याबरोबर रोजंदारीवर घेऊन जात असल्यामुळे विद्यार्थ्यांची अनुपस्थिती ही पण मोठी समस्या भेडसावते.

**अतिदुर्गम भागांतील शाळांमध्ये यशस्वी नेतृत्वाचा अभ्यास:**

अतिदुर्गम आदिवासी भागांत काम करत असतांना शाळा प्रमुख या नात्याने शालेय नेतृत्वाला अनेक अडचणी व आव्हानांना सामोरे जावे लागते. अशाही प्रतिकूल परिस्थितीत आपल्या नेतृत्व कौशल्याचा यथायोग्य उपयोग करून काही मुख्याध्यापक व शिक्षक अनेकविध उपक्रम राबवून शाळेचा अध्ययन स्तर उंचावण्यासाठी तसेच गुणवत्ता विकासासाठी शिक्षणातून परिवर्तन घडविण्यासाठी सतत प्रयत्नशील असतात. अशाच एका शालेय नेतृत्वाची यशोगाथा आपण अभ्यासणार आहोत ज्यांनी शिक्षकांच्या मदतीने

शाळेच्या, गावाच्या विकासासाठी अनेकविध उपक्रम राबविले. या उपक्रमांची शाळा, गाव, केंद्र, तालुका स्तरावर यशस्वीपणे अंमलबजावणी करून विद्यार्थ्यांचा तसेच पालकांचा वैयक्तिक, सामाजिक विकास साधत शैक्षणिक वातावरणात सुधारणा करून शिक्षणातून परिवर्तन घडवण्याचा यशस्वी प्रयत्न केला. म्हणजेच पालकांच्या शिक्षणामुळे (प्रौढ शिक्षण) शक्य झाले यामुळे हे मोड्यूल तयार करण्यात आले. एक विषय सहाय्यक या नात्याने माझ्याकडे एटापल्ली हा तालुका संपर्क अधिकारी म्हणून देण्यात आला. त्या अनुषंगाने एटापल्ली तालुक्यातील शाळांना वारंवार भेटी देणे, निरनिराळ्या विषयांवर प्रशिक्षण, कार्यशाळा घेऊन शिक्षकांचे सक्षमीकरण करणे, ह्या माध्यमातून जाजावंडी ही शाळा शाळेच्या मुख्याध्यापकांच्या सकारात्मक दृष्टीकोनामुळे लक्षवेधी ठरली. शाळेतील शिक्षक, मुख्याध्यापकांशी गुणवत्ता वाढीबद्दल चर्चा करण्यात आली. व बालकांच्या शिक्षणामध्ये पालकांचा खूप मोठा वाटा आहे हे लक्षात घेऊन त्यांनी पालकांच्या शिक्षणासाठी घेतलेली जबाबदारी यातून शाळेला मिळालेले यश यामुळे या विषयावर मोड्यूल विकसित करण्यात आले.

**यशोगाथा**

**जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, जाजावंडी**

**केंद्र:-गट्टा पंचायत समिती:- एटापल्ली जिल्हा:- गडचिरोली**

**श्री.मांत्तय्या बेडके मुख्याध्यापक**

- पत्ता:- जाजावंडी, पोस्ट:- गट्टा तालुका:- एटापल्ली जिल्हा: गडचिरोली
- स्थापना वर्ष:- जानेवारी 2000
- एरिया :- अतिदुर्गम / नक्षलग्रस्तभाग
- प्रवर्ग:- प्राथमिक
- वर्ग :- १ ते ७
- एकूण पटसंख्या :- 123
- शिक्षक संख्या :- नियमित १ शिक्षक प्रतिनियुक्तीवर एकूण :- 2

**शाळेची सुरुवातीची पार्श्वभूमी :-** शैक्षणिकसत्र 2010 -2011 मध्ये या शाळेची पटसंख्या ७ इतकी होती व या शाळेवर २ शिक्षक कार्यरत होते. गावाची लोकसंख्या ६००, ६ ते १४ वयोगटातील भरपूर विद्यार्थी पण गावातील शाळेत न शिकता बाहेरगावच्या आश्रम शाळेत शिकत होते. पालकांच्या शिक्षणाविषयी अनास्था व कौटुंबिक दारिद्रय यामुळे कसेबसे आपल्या पाल्यांना आश्रमशाळेत टाकणे व आपण निश्चिंत राहणे एवढाच. शाळेची पटसंख्या जेमतेम ७ त्यापैकी ४ विद्यार्थी शाळेत येत असत व बाकीचे ३ पालकांसोबत शेतात, जंगलात जातअसे, त्यामुळे सर्वात आधी पालकांचे उद्बोधन करण्याची नितांत गरज वाटली. कारण पालक स्वतः निरक्षर शासनाच्या योजनांबद्दल अनभिज्ञ होते.

**प्रौढ शिक्षणाची गरज :** जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा जाजावंडी ही शाळा अतिदुर्गम व नक्षलग्रस्त अदिवासी भागात असल्याने या भागातील अनेक पालक निरक्षर होते. शिक्षण विषयक जागरूक नाहीत, त्यामुळे त्यांच्या पाल्यांना शिक्षण देणे हे तेवढे त्यांना महत्त्वाचे वाटत नाही. पाल्यांना लहानपणापासून जंगलात सोबत कामासाठी नेतात त्यामुळे मुले शाळाबाह्य राहतात, यासाठी पालकांना शिक्षित करणे गरजेचे वाटले. शिक्षणाबद्दलची उदासिनता आणि बहुतेक पालक निरक्षर असल्याने त्यांचे उद्बोधन करून शिक्षणाचे महत्त्व पटवून देण्यात आले. त्यांचा आपल्या पाल्यांच्या शिक्षणामध्ये सहभाग करून घेण्यात आला. त्यामुळे विविध कार्यक्रम घेऊन शाळेचे आकर्षण वाढविण्याचा प्रयत्न झाला. व त्यातून पालकांना शाळेचे शिक्षणाचे महत्त्व पटवून देण्यात यश आले. आणि गावामध्ये प्रौढ शिक्षणाचा प्रारंभ झाला.

**प्रौढ शिक्षणाची अंमलबजावणी :** सर्वप्रथम पालकांचे त्यांच्या शैक्षणिक स्तरानुसार गट तयार करण्यात आले. सर्व पालक कामावर जाणारे असल्यामुळे सगळयांच्या सोयीनुसार रात्रीची वेळ ठरवण्यात आली. गावातील गोटूल मध्ये जागा निश्चित करण्यात आली. काहींना फक्त अक्षरओळख होती, काहींना अडखळत वाचता येत होतं पण गणितीय ज्ञान नव्हतं. काही पुर्णपणे निरक्षर होते. त्यानुसार त्यांचे गट तयार केले. सुरुवातीला 10 पाट्या विकत आणल्या व मी स्वतः 10 लोकांना शिकवण्यास सुरुवात केली. 10 ही लोक मुळाक्षरे,बाराखडी शिकले व स्वतःची सही करू लागले. त्यामुळे इतर ही पालक शिकण्यास उत्सुक झाले,त्यानंतर गावात 2 स्वयंसेवकांची नेमणूक करण्यात आली. काही साक्षर पालकांना एकेका गटाचा प्रमुख करून त्यांच्या मदतीने त्यांच्या अध्ययन स्तरानुसार कृतीआराखडे तयार करून त्यांचे अध्ययन सुरु झाले. वाचन, लेखन, अंक ओळख, संख्याज्ञान, संख्यांवरील क्रिया याबरोबरीनीच मूल्यशिक्षण, प्रार्थना, देशभक्तीपर गीते इत्यादी गोष्टी सुद्धा आनंदाने शिकू लागली.. त्यांना शासनाच्या विविध योजनांची ओळख करून देण्यात आली. यातून गावात सुमारे १५० लोकांना साक्षर करण्यात आले.

**प्रौढ शिक्षणाचा विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर परिणाम:-** गावातील बहुतेक लोक निरक्षर असल्याने गावात शैक्षणिक वातावरण निर्माण झाले नव्हते, त्यामुळे विद्यार्थी घरी गेल्यावर गृहपाठ करत नव्हते म्हणून विद्यार्थी अभ्यासात मागे राहत होते, पण गावातील लोकांसाठी प्रौढ शिक्षण सुरू केल्याने गावात शैक्षणिक जागृती निर्माण झाली, त्यामुळे पालक व विद्यार्थी यांनी गावातील चौकात बसून अभ्यास करायला सुरुवात केली, विद्यार्थी गृहपाठ वेळेवर करू लागले. प्रौढ शिक्षण उपक्रम गावात सुरू केल्याने गावात शैक्षणिक जागरूकता निर्माण झाली, त्यामुळे पालकांचा कल शिक्षणाकडे वाढला व बहुतांशी पालक आपल्या पाल्यांना शाळेत प्रवेश दिला. त्यामुळे गावातील सर्व मुले गावच्या शाळेत शिक्षण घेऊ लागले.गावातील काही विद्यार्थी बाहेर गावात शिकायला गेले त्यांनी परत गावाच्या शाळेत प्रवेश घेतला. त्याचप्रमाणे गावाच्या आजूबाजूला असलेल्या गावातील मुले देखिल या शाळेत प्रवेश घेऊ लागले. इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिकत असलेले काही विद्यार्थ्यांनी या शाळेत प्रवेश घातला.

प्रौढ शिक्षणातून पालक ग्रामस्थ यांचे शिक्षणाची गोडी वाढली ते शाळेत संपर्क करू लागले, येऊ लागले त्यातून शाळेबद्दल त्यांना आस्था वाटू लागली म्हणून विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढवणे टिकवणे सोयिस्कर झाले.

**( प्रौढशिक्षण घेताना गावकरी)**

**शाळेचा कायापालट करण्यासाठी शाळेने केलेले प्रयत्न:-** पालकांच्या शिक्षणामुळे पालकांना शिक्षणाचे महत्त्व पटले व त्यांना शाळेची, शिक्षणाची गोडी वाटू लागली ते शाळेत संपर्क करू लागले, शाळेच्या उपक्रमांमध्ये सहभाग घेऊ लागले. यातूनच त्यांना शाळेबद्दल आस्था वाटू लागली आणि म्हणून पालक मुख्याध्यापक व शिक्षक उपस्थिती वाढविणे, आणि गुणवत्ता वाढविणे यासारख्या उपक्रमांमध्ये स्वयंप्रेरणेने सहभागी होऊ लागले. खालील उपक्रमांद्वारे शाळेत विद्यार्थी विकासास पोषक वातावरण तयार झाले.

**1) शाळा रंगरंगोटी व बोलकी करणे :-**

विद्यार्थी शाळेत रमावे व विद्यार्थ्यांना शाळेची गोडी लागावी यासाठी सर्वप्रथम शाळेची रंगरंगोटी करून शाळा बोलकी करण्यात आली. यासाठी गावकरी प्रेरित होऊन समाजाचा सहभाग घेऊन शाळा बोलकी करण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात आले.




( शाळा रंगरंगोटी  केल्यानंतरचे दृश्य )


**2) पटसंख्या वाढीसाठी प्रयत्न करणे:-** सन-2010 – 2011 मध्ये  जिल्हा  परिषद प्राथमिक  शाळा जाजावंडी या  शाळेची  पटसंख्या केवळ  ७  होती, त्यामुळे  शाळेची पटसंख्या  वाढावी यासाठी शाळा  स्तरावर विविध नाविण्यपूर्ण  उपक्रमांची  आखणी  करण्यात  आली. व पालकांच्या उद्बोधानामुळे पालकांचे सुद्धा सहकार्य मिळू लागले. व शाळेत गुणवत्तापूर्ण  शिक्षण  देण्यास  सुरुवात करण्यात  आली. त्यामुळे  शाळेतील पटसंख्या हळूहळू वाढत गेली. सन 2010 ते आजपर्यंतची पटसंख्या खालीलप्रमाणे वाढ झालेली आहे.

2022-2023




(शाळेच्या पटसंख्येत वाढ )

## २. मागील पाच वर्षात वर्गात/शाळेत झालेली पटसंख्या वाढ



## 3.मागील पाच वर्षात वर्गात/शाळेत झालेली गुणवत्ता वाढ

| अनु.क्र. | सत्र | भाषा समजपूर्वक वाचन स्तर टक्केवारी | गणित भागाकार स्तर टक्केवारी | शेरा |
|---|---|---|---|---|
| | 2018-19 | 36% | 40% | |
| | 2019-20 | 42% | 52% | |
| | 2020-21 | 64% | 69% | |
| | 2021-22 | 91% | 92% | |
| | 2022023 | 93% | 94% | |

3) **वनभोजन / क्षेत्रभेट कार्यक्रम** :- विद्यार्थ्यांना व पालकांना शाळेविषयी गोडी लागावी व विद्यार्थ्यांची विविध कलाकौशल्ये वाढीस लागावी व शालेय कामात समाजाचा सहभाग वाढावा यासाठी दरवर्षी शाळेत वनभोजन / क्षेत्रभेट कार्यक्रम आयोजन केले जाते. पालकांच्या शिक्षणामुळे पालक स्वतःहून अशा उपक्रमांचे आयोजन करून सहभाग घेऊ लागले.



4) **क्रीडाक्षेत्रात अव्वल शाळा**:-शालेय बाल कला व क्रीडा संमेलनात या शाळेतील चिमुकले खेळाडू इतर शाळातील दिग्गज खेळाडूंना हरवत गेल्या पाच वर्षापासून केंद्रस्तरावर तसेच गेल्या तीन वर्षापासून तालुकास्तरीय क्रीडासंमेलनात उत्तम कामगिरी केली आहे.

**5) हंगामी वसतिगृह योजना:-** शाळा आदिवासी बहुल अतिदुर्गम नक्षलग्रस्त क्षेत्रात येत असल्याने या भागातील बरेच विद्यार्थी शाळाबाह्य होतात, सर्वेक्षणानंतर असे लक्षात आले की गावातील पालक बाहेरगावी कामावर जातांना आपल्याबरोबर आपल्या मुलांना आपल्या बरोबर घेऊन जातात व त्यामुळे विद्यार्थ्यांचे तात्पुरते स्थलांतर होते व ते शाळाबाह्य होतात. त्यामुळे पालकांना विश्वासात घेऊन हंगामी वसतिगृहाचा लाभ विद्यार्थ्यांना देण्यात आला. पालकांच्या शिक्षणामुळे व शाळेतील विविध उपक्रमांमुळे पालकांना शाळेबद्दल आत्मीयता व शिक्षकांबद्दल विश्वास वाटू लागला त्यामुळे पालक आपल्या मुलांना वसतिगृहात ठेऊन कामासाठी बाहेरगावी जाऊ लागले.




**( हंगामी वसतिगृहाचे उद्घाटन करताना केंद्रप्रमुख )**

अशाप्रकारे जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा जाजावंडी येथे विविध नाविण्यपूर्ण उपक्रमांचे आयोजन विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे धडे देऊन शाळेचा कायापालट करून विद्यार्थी संख्या वाढवण्यासाठी या शाळेतील शिक्षकांनी विशेष प्रयत्न केले.

1) **मुख्याध्यापक व शिक्षकांनी स्वविकासासाठी केलेले कार्य:-**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जाजावंडी येथील शिक्षकांनी व मुख्याध्यापकांनी स्वविकासासाठी विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांचे आयोजन करून विकास साधण्याचे प्रयत्न केले, जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा जाजावंडी ही शाळा आदिवासी बहुल नक्षलग्रस्त भागात असल्याने या भागातील आदिवासी जनता माडिया ही भाषा बोलतात, अध्ययन अध्यापन करताना शिक्षकांना माडिया भाषा येत नसल्यामुळे अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते म्हणून शिक्षकांनी सर्वप्रथम माडिया भाषा शिकण्यास सुरुवात केली व माडिया भाषा आत्मसात केली त्यातून विद्यार्थ्यांना अध्ययन-अध्यापन करणे सुलभ झाले.




**(थोर नेत्यांच्या जयंत्या, बालसभेचे आयोजन)**

2) **अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत बदल :-** या शाळेत सुरुवातीला विद्यार्थी संख्या फारच कमी होते, विद्यार्थी संख्या वाढण्यासाठी या शाळेतील शिक्षकांनी अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत रंजकता आणून विविध व नवनवीन अध्यापन पद्धतीचा वापर करून विद्यार्थ्यांना अध्यापन करण्यास सुरुवात केली व पालकांच्या शिक्षणामुळे त्यांचा सहभाग वाढला.

**शाळा विकासात शिक्षक पालक संघ / शालेय व्यवस्थापन समिती/ पालक सहभाग यातून विद्यार्थी व शाळा विकासात झालेले बदल :-** पालकांच्या शिक्षणामुळे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जाजावंडी या शाळेत विद्यार्थी संख्या झपाट्याने वाढत गेल्यामुळे या शाळेत वर्ग पाचवी सहावी व सातवी जोडण्यात आले मात्र जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जाजावंडी या शाळेत वर्ग खोल्या मात्र दोनच होत्या. शाळा व्यवस्थापन समिती व गावातील नागरिकांनी मिळून शाळेसाठी दोन वर्गखोल्यांचे बांधकाम करून दिले व वेळोवेळी शाळेसाठी शिक्षक पालक संघ/ शालेय व्यवस्थापन समितीचा सक्रीय सहभाग प्राप्त झाला.



**( लोकसहभागातून वर्गखोली बांधकाम )**

3) **शैक्षणिक व प्रशासकीय कामकाजात तंत्रज्ञानाचा वापर :-** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जाजावंडी या शाळेला ग्रामपंचायत मार्फत टीव्ही व इतर साहित्य देण्यात आले त्यामुळे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत डिजिटल वर्गाची निर्मिती करण्यात आली असून त्यातून विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाचे धडे देण्यात येत आहेत.




**( टिलीमिली कार्यक्रम बघताना शाळेतील विद्यार्थी )**

4) **शालेय गुणवत्तेत वाढ होण्यासाठी प्रशिक्षणाचे योगदान :-** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जाजावंडी येथील शिक्षकांना या शाळेतील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत वाढ होण्यासाठी प्रशिक्षणाचा मोठा फायदा झाला आहे, या शाळेतील शिक्षक वेळोवेळी तालुकास्तरावर, जिल्हास्तरावर, राज्यस्तरावर आयोजित प्रशिक्षणामध्ये सहभागी होतात. पालकांच्या शिक्षणामुळे पालकांनी वेळोवेळी शिक्षकांना सहकार्य व प्रशिक्षणांसाठी मुलांना पाठवण्यास अनुमती दिली. व प्रोत्साहित केले.



**(राज्यस्तरावर जालना येथे बालरक्षक प्रशिक्षण घेऊन शाळाबाह्य विध्यार्थ्यांना शाळेत दाखल केले)**

5) **जिल्हा, विभाग, राज्य, राष्ट्रीय स्तरावर यशस्वीउपक्रम क्रीडा प्रकार कला प्रकार स्पर्धा यात नैपुण्य :**
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जाजावंडी या शाळेतील विद्यार्थी खेळांमध्ये प्रावीण्य मिळवले आहेत सलग पाच वर्षापासून केंद्रस्तरीय क्रीडासंमेलनांमध्ये चंपियनशिप प्राप्त केले आहे तसेच सलग तीन वर्षापासून तालुकास्तरीय क्रीडासंमेलनामध्ये चॅम्पियनशिप प्राप्त केले आहे तसेच जिल्हास्तरावर वैयक्तिक खेळामध्ये या शाळेतील विद्यार्थ्यांनी नैपुण्य मिळवले आहे.



**( जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत चषक स्वीकारताना जाजावंडी शाळेतील विद्यार्थी )**

**( दर वर्षी वार्षिक स्नेहसंमेलन आयोजन करून विद्यार्थी कलागुणांचा विकास )**








(गुलेर धरून शिकारीसाठी जंगलात निघालेला विद्यार्थी, शिक्षणाच्याप्रवाहात )

शाळेत कधीही न जाणारा सतत पालकांसोबत शिकारीसाठी जंगलात जाणारा वरील छायाचित्रातील मुलगा आज या शाळेत नियमित शिक्षण घेत आहेत. पालक शिक्षणातून विद्यार्थी शिक्षण यशस्वी होऊ शकते असेच या यशोगाथेवरून दिसून येते.

राज्यस्तरीय शिक्षक पुरस्कार बाबत माहिती लिंक:-

https://drive.google.com/file/d/1CUpEP4knk21ReXLKN39jEsnsLuHZSJ9i/view?usp=drivesdk

**श्री.एम.सी.बेडके मुख्याध्यापक जि.प.उ.प्राथ.शाळा, जाजावंडी** यांना मिळालेला राज्यस्तरीय शिक्षक पुरस्कार त्यांच्या शालेय नेतृत्वाची सक्षमता दर्शवितो.

**चिंतनात्मक प्रश्न:**

1) अतिदुर्गम आदिवासी व नक्षलग्रस्त भागांतील शाळांमध्ये शैक्षणिक वातावरणात सुधारणा करण्यासाठी कोणती उपाययोजना करता येईल असे आपणास वाटते ?
2) आदिवासीबहुल भागांतील शाळांमधील बोलिभाषेची अडचण दूर करता येण्यासाठी कोणत्या उपाययोजना आपल्याला आवश्यक वाटतात. थोडक्यात लिहा?

**चिंतन:** प्रत्येक व्यक्तीमध्ये मग तो शाळा प्रमुख म्हणून मुख्याध्यापक असो, शिक्षक असो वा पालक प्रत्येकामध्ये कोणत्या ना कोणत्या क्षमता असतात,गुण असतात. कोणामध्ये वक्तृत्वशैली,संप्रेषण कौशल्य तर कोणामध्ये संघटन कौशल्य आणि एखाद्या ध्येयाचा ध्यास घेतल्यास तो पूर्ण करण्यासाठी व्यक्ती सर्वतोपरी प्रयत्न करतेच. शाळेचा गुणवत्ता विकास, शैक्षणिक वातावरणामध्ये सुधारणा करायची असल्यास प्रत्येकाला प्रथम हा विश्वास असला पाहिजे की प्रत्येक मूल शिकू शकते. आणि हा विश्वास एकदा निर्माण झाला की शिक्षकांनी आधी स्वत:पासून कामाला सुरुवात करून कामाचे स्वरूप, मिळत असलेले यश पाहून पालक,समज सुद्धा त्याकडे आकर्षित होऊन त्यांचेसुद्धा सहकार्य मिळते आणि निश्चितच शैक्षणिक वातावरणात सुधारणा घडून येते.

शिक्षणाचा अधिकार २००९ या कायद्यानुसार प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र शासन निर्णय दि. २२ जून,२०१५शलेय शिक्षण विभाग, मंत्रालय मुंबई या कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्रातील शालेय शिक्षणात अत्यंत महत्त्वपूर्ण मुद्द्यांवर विचार करण्यात आला. जसे की शाळाबाह्य विद्यार्थी शाळेत आणणे, वयानुरूप प्रवेश, बालरक्षक चळवळ, दाखल्याविना प्रवेश, नापास न करणे यातूनही आदिवासी व दुर्गम भागांतील शाळांमध्ये येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी राज्य स्तरावरून समता व आदिवासी विभागांतर्गत शिक्षण विभागातील अधिकारी ते शिक्षक सर्वांचे सक्षमीकरण करण्यासाठी विविध प्रशिक्षणे उपक्रम, कार्यक्रम घेण्यात येतात.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP २०२०)मध्ये आदिवासी व दुर्गम भागांतील शिक्षण :** राष्ट्रीय शिक्षण धोरण (NEP २०२०)मध्ये आदिवासी व दुर्गम भागांतील शिक्षण यामध्ये स्पष्ट नमूद केले आहे की, मोठ्या प्रमाणात आदिवासी लोकसंख्या असलेल्या राज्यांमध्ये प्राथमिक वर्गासाठी मातृभाषेवर आधारित बहुभाषिक शिक्षण कार्यक्रम आहेत. परंतु अजूनही अनेक शाळांमध्ये आदिवासी भाषिक शिक्षकांची अनुपलब्धता जाणवते. पाहिजे त्या प्रमाणात शिक्षकांचे उद्बोधन झाल्याचे दिसत नाही. शासनाने आपल्या आदिवासी भागात शिक्षणाचा दर्जा सुधारण्यावर आपले लक्ष केले पाहिजे.यावर NEP २०२० जास्त लक्ष केंद्रित करते व मातृभाषेतून शिक्षण मिळावे अशी व्यवस्था करण्याची गरज असल्याचे दर्शविते.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अनुषंगाने मोड्यूल संदर्भात गुणवत्तापूर्ण शिक्षण :** शिक्षण व्यवस्थेचा उद्देश तर्कसंगत विचार व कृती करण्यास सक्षम असणारा, करुणा आणि सहानुभूती बाळगणारा, धैर्यशील, लवचिक, विज्ञाननिष्ठ आणि रचनात्मक विचार करणारा, नैतिक अधिष्ठान आणि मूल्यांनी युक्त मानव निर्माण करणे हा आहे. आपल्या राज्यघटनेद्वारा परिकल्पित-समन्यायी, समावेशक आणि बहुविध समज निर्मितीसाठी मोलाचे योगदान देतील अशा कार्यमग्न, उत्पादक व योगदान देणाऱ्या नागरिकांची निर्मिती करणे हा सदर शिक्षण व्यवस्थेचा उद्देश आहे.

**व्यापक शिक्षण प्रणाली आणि त्यातील व्यक्तिगत संस्था यांना मोड्यूलसंदर्भात काही मार्गदर्शक तत्त्वे:**

1) विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आणि अशैक्षणिक क्षेत्रांतील सर्वांगीण विकासास चालना देण्यासाठी शिक्षक तसेच पालकांना संवेदनशील बनवून प्रत्येक विद्यार्थ्यांची अद्वितीय क्षमता ओळखणे, शोधणे आणि वृद्धिंगत करणे.
2) इयत्ता 3 री अखेर सर्व विद्यार्थ्यांनी पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान साध्य करण्यासाठी सर्वोच्च प्राधान्य देणे.
3) विद्यार्थ्यांना स्वतःचे शिकण्याचे मार्ग आणि शिक्षणक्रम निवडण्याची मुभा, आणि त्याद्वारे त्यांच्यातील कौशल्य आणि आवडीनुसार जीवनात त्यांचे मार्ग निवडण्याची मुभा असेल अशी लवचिकता देणे,
4) विविध अध्ययन क्षेत्रातील हानिकारक स्तर रचना व विभागणीचे उच्चाटन करण्यासाठी कला आणि विज्ञान शाखा, अभ्यास्क्रमीय आणि अभ्यासक्रमबाह्य उपक्रम, व्यावसायिक आणि शैक्षणिक प्रवाह, इत्यादीमध्ये कोठेही भेद नसणे,
5) परीक्षेसाठी शिक्षण व घोकंपट्टी यांवर भर न देता संकल्पनात्मक आकलनावर भर देणे,
6) सहानुभूती, इतरांचा सन्मान, स्वच्छता, शिष्टाचार, लोकशाहीची भावना, सेवेची भावना, सार्वजनिक मालमत्तेचा आदर, वैज्ञानिक दृष्टीकोन, स्वातंत्र्य, जबाबद, बहुविधता, समानता आणि न्याय यासारखी मानवी व घटनात्मक मूल्ये आणि नैतिकता,
7) अध्ययन अध्यापन प्रक्रियेमध्ये बहुभाषिकता आणि भाषा सामर्थ्याला प्रोत्साहन देणे,

8) अध्ययन अध्यापन प्रक्रिया, भाषिक अडथळयांचे निर्मुलन,दिव्यांग बालकांसाठी सुविधांच्या उपलब्धतेत वृद्धी आणि शैक्षणिक नियोजन व व्यवस्थापन यांसाठी तंत्रज्ञानाचा विस्तृत वापर करणे,
9) शिक्षण हा एक समवर्ती विषय आहे हे नेहमी लक्षात घेऊन सर्व अभ्यासक्रम, अध्यापनशास्त्र आणि धोरण यांमध्ये विविधता आणि स्थानिक संदर्भांचा आदर.

**मुख्याध्यापकांच्या दृष्टीने मोड्यूलची उपयुक्तता :** गुणवत्ता विकासासाठी शैक्षणिक वातावरणात परिवर्तन घडवून आणणे हे फार आवश्यक आहे. त्यात शाळा प्रमुख म्हणून मुख्याध्यापक तसेच सर्व शिक्षक विद्यार्थी, पालक तसेच सर्व पर्यवेक्षकीय घटक जबाबदार आहे. नवीन शैक्षणिक धोरण २०२० मध्ये बालकांच्या शिक्षणात पालकांची शाश्वत जबाबदारी महत्त्वपूर्ण मानली आहे. पालक जबाबदार, समजदार तर पाल्य सुद्धा जबाबदार म्हणून सर्वप्रथम पालकांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देऊन त्यांना शाळेचे महत्त्व पटले तर ते आपल्या पाल्यांना शाळेत पाठवतील म्हणून शाळा प्रमुखाने पालकांच्या शिक्षणाचे महत्त्व समजून घ्यायला हे मोड्यूल उपयुक्त आहे. शाळा प्रमुखाने शाळेशी सबंधित सर्व भागधारक यांच्याशी अभ्यासक्रम, पाठ्यक्रम, शैक्षणिक आंतरक्रिया तसेच सहशालेय उपक्रम या संदर्भाने सातत्याने चर्चा करून विविध उपक्रमांची आखणी करता येईल. विद्यार्थ्यांचा अध्ययन स्तर उंचावणे, सर्वांगीण विकास करणे, त्यांच्या अभ्यासक्रमासोबतच त्यांच्यातील विविध कलागुणांना संधी देऊन त्यांच्यामध्ये विविध कौशल्ये विकसित करून घेता येतील. विद्यार्थ्यांना सतत शिकतं ठेवण्यासाठी त्यांना फक्त पाठ्यक्रम न शिकवता शिकायचं कसं आणि मिळालेल्या ज्ञानचा वापर जीवनात कसा केल्या जाईल यावर शाळेतील शिक्षक प्रयत्नशील असतील.

**समारोप :** एकूणच पालकांना शिक्षण मिळाल्याने ते जागरूक झाले व त्यातूनच आपले मुल शिकावे यासाठी प्रयत्न करत आहेत. मुख्यत: मुलींच्या शिक्षणाबद्दलचे त्यांचे विचार बदलले व मुलींचे शिक्षण घेण्याचे प्रमाण लक्षणीयरित्या वाढतांना दिसत आहे.

**संदर्भसूची:**


1) राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा, २००५
2) शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९
3) प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र शासन निर्णय, २०१५
4) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, (NEP) २०२०
5) शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण-२०२१/प्र.क्र.१७९/एसडी-६



**मोड्यूल विकसक**
सुचरिता काळे
विषय सहाय्यक गणित
जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था, गडचिरोली

**समन्वयन**
डॉ.ज्योती कुलकर्णी
समन्वयक
महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा), औरंगाबाद

**मार्गदर्शक**
श्री.रमाकांत काठमोरे
संचालक
महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा),औरंगाबाद